सन २०१९-२० करिता कृषि उन्नती योजना-राष्ट्रीय अन्न सुरक्षा अभियान-वाणिज्यिक पिकांकरिता (कापूस, ऊस) ₹३४.१५ लक्ष निधी अनुसूचित जाती प्रवर्गासाठी वितरीत करण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
कृषि, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभाग
शासन निर्णय क्रमांक : राअसुअ-१०१९/प्र.क्र.५८/४-अे.
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय विस्तार, मुंबई - ४०० ०३२
दिनांक : २० सप्टेंबर, २०१९

संदर्भ:-

१. कृषी व पदुम विभागाचा शासन निर्णय क्र. संकीर्ण-२०१७/प्र.क्र.३१/१७-अे, दि. १९/०४/२०१७.
२. वित्त विभागाचे परिपत्रक क्र. अर्थसं-२०१९/प्र.क्र.४४/अर्थ-३ दि. ०१/०४/२०१९.
३. कृषि, सहकार व शेतकरी कल्याण विभाग, कृषि व शेतकरी कल्याण मंत्रालय, भारत सरकार यांचे पत्र क्र. No.२-९/२०१५ - CU-IV दि. ०९/०४/२०१९.
४. कृषी आयुक्तालयाचे पत्र क्र.कृआ/विप्र३/राअसुअऊस/योजना/१७२/२०१९, दि.११/०४/२०१९.
५. कृषि व पदुम विभाग शासन निर्णय क्र. अेअेपी-२०१९/प्र.क्र.२२/४-अे, दि.०३/०६/२०१९.
६. कृषि, सहकार व शेतकरी कल्याण विभाग, कृषि व शेतकरी कल्याण मंत्रालय, भारत सरकार यांचे पत्र क्र. No.२-९/२०१५ - CU-IV दि. १८/०७/२०१९
७. कृषी आयुक्तालयाचे पत्र क्र.कृआ/विप्र३/राअसुकापूस/१९-२०/३०५/२०१९, दि.२०/०७/२०१९

प्रस्तावना :-

सन २०१९-२० करिता केंद्र शासनाने राष्ट्रीय अन्न सुरक्षा अभियानांतर्गत वाणिज्यिक पिकांकरीता (कापूस, ऊस) संदर्भाधिन दि.०९/०४/२०१९ च्या पत्रान्वये ₹ ८७२.५८ लाख रकमेचा कृती आराखडा मंजूर केला असून त्यानुसार ₹ ८७२.५८ लाख (केंद्र हिस्सा रु.५२३.५५ लाख + राज्य हिस्सा रु.३४९.०३ लाख) रकमेच्या कृती आराखडयास दि.०३ जून २०१९ रोजीच्या शासन निर्णयान्वये प्रशासकीय मान्यता प्रदान केलेली आहे. केंद्र शासनाने अभियानांतर्गत दिनांक १८/०७/२०१९ च्या पत्रान्वये पहिल्या हप्त्यात केंद्र हिस्स्याचा ₹ २००.८० लक्ष निधी वितरीत केलेला असून कृषि आयुक्तालयाच्या दि.२०/०७/२०१९ च्या पत्रान्वये केलेल्या मागणीप्रमाणे केंद्र व राज्य हिस्स्याचा आवश्यक निधी वितरीत करण्याबाबत पुढीलप्रमाणे निर्णय घेत आहे :-

शासन निर्णयः

१. सन २०१९-२० करिता राष्ट्रीय अन्न सुरक्षा अभियानांतर्गत वाणिज्यिक पिकांकरिता (कापूस, ऊस) अनुसूचित जाती प्रवर्गाकरिता केंद्र व राज्य हिस्स्याचा एकूण ₹ ३४.१५ लाख निधी (रुपये चौतीस लाख पंधरा हजार फक्त) आयुक्त (कृषि) यांना अर्थसंकल्पीय वितरण प्रणालीवर वितरीत करण्यास मान्यता देण्यात येत आहे. सदर निधीचे पीक निहाय तसेच केंद्र व राज्य हिस्स्याचे विवरण पुढीलप्रमाणे आहे:-

(₹ लाख)

अ. क्र.	राष्ट्रीय अन्न सुरक्षा अभियान अंतर्गत वाणिज्यिक पिके	अनुसूचित जाती प्रवर्ग		एकूण वितरीत निधी
		केंद्र हिस्सा (६०%)	राज्य हिस्सा (४०%)	
१.	कापूस	१४.९६	९.९७	२४.९३
२.	ऊस	५.५३	३.६९	९.२२
	एकूण	**२०.४९**	**१३.६६**	**३४.१५**

२. परिच्छेद १ मध्ये नमूद केल्यानुसार **कापूस पिकांकरिता** केंद्र हिस्स्याचा ₹१४.९६ लक्ष निधी (रुपये चौदा लाख शहाण्णव हजार फक्त) आणि राज्य हिस्स्याचा ₹९.९७ लाख निधी (रुपये नऊ लाख सत्त्याण्णव हजार फक्त) असा एकूण ₹२४.९३ लक्ष निधी (रुपये चोवीस लाख त्र्याण्णव हजार फक्त) वितरीत करण्यात येत आहे.

३. परिच्छेद १ मध्ये नमूद केल्यानुसार **ऊस पिकांकरिता** केंद्र हिस्स्याचा ₹५.५३ लक्ष निधी (रुपये पाच लाख त्रेपन्न हजार फक्त) आणि राज्य हिस्स्याचा ₹३.६९ लक्ष निधी (रुपये तीन लाख एकोणसत्तर हजार फक्त) असा एकूण ₹ ९.२२ लक्ष निधी (रुपये नऊ लाख बावीस हजार फक्त) वितरीत करण्यात येत आहे.

४. परिच्छेद क्र. १ ते ३ मध्ये नमूद केल्यानुसार, कापूस, ऊस या पिकांकरिता वितरीत केलेला अनुसूचित जाती प्रवर्गाचा निधी सन २०१९-२० मध्ये पुढील लेखाशिर्षाखाली अर्थसंकल्पीत केलेल्या तरतुदीतून खर्ची टाकावा:-

केंद्र/राज्य हिस्सा	लेखशिर्ष अनुसूचित जाती प्रवर्ग	
	कापूस	ऊस
केंद्र हिस्सा	मागणी क्रमांक डी-३ २४०१- पीक संवर्धन १०८, वाणिज्यीक पिके (००) (७८९)-अनुसूचित जाती उपयोजना, (०१) (०९) राष्ट्रीय अन्न सुरक्षा अभियान-कापूस (केंद्र हिस्सा ६०%) (केंद्र पुरस्कृत योजना) (२४०१A२०७) (योजनांतर्गत) (दत्तमत) ३३, अर्थसहाय्य	मागणी क्रमांक डी-३ २४०१- पीक संवर्धन १०८, वाणिज्यीक पिके (००) (७८९)-अनुसूचित जाती उपयोजना, (०२) (०७) राष्ट्रीय अन्न सुरक्षा अभियान-ऊस (केंद्र हिस्सा ६०%) (केंद्र पुरस्कृत योजना) (२४०१A१८१) (योजनांतर्गत) (दत्तमत) ३३, अर्थसहाय्य

राज्य हिस्सा	**मागणी क्रमांक डी-३** **२४०१- पीक संवर्धन** **१०८, वाणिज्यीक पिके** **(००) (७८९)-अनुसूचित जाती उपयोजना,** **(०१) (१०) राष्ट्रीय अन्न सुरक्षा अभियान-कापूस (राज्य हिस्सा ४०%)** **(केंद्र पुरस्कृत योजना) (२४०१A२१६) (योजनांतर्गत) (दत्तमत)** **३३, अर्थसहाय्य**	**मागणी क्रमांक डी-३** **२४०१- पीक संवर्धन** **१०८, वाणिज्यीक पिके** **(००) (७८९)-अनुसूचित जाती उपयोजना,** **(०२) (०८) राष्ट्रीय अन्न सुरक्षा अभियान-ऊस (राज्य हिस्सा ४०%)** **(केंद्र पुरस्कृत योजना) (२४०१A१९२) (योजनांतर्गत) (दत्तमत)** **३३, अर्थसहाय्य**

५ शासन निर्णयान्वये राष्ट्रीय अन्न सुरक्षा अभियानाकरीता उपलब्ध करुन दिलेल्या एकूण ₹ ३४.१५ लाख निधी संचालक (विस्तार व प्रशिक्षण) यांनी PFMS प्रणालीद्वारे जिल्हा निहाय वितरीत करावा.

६. या शासन निर्णयान्वये उपलब्ध करुन दिलेल्या ₹ ३४.१५ लाख निधीच्या आहरणाकरिता संचालक (विस्तार व प्रशिक्षण), कृषी आयुक्तालय, पुणे यांना नियंत्रण अधिकारी आणि सहायक संचालक (लेखा-१), कृषी आयुक्तालय, पुणे यांना आहरण व संवितरण अधिकारी म्हणून घोषित करण्यात येत आहे.

७. या शासन निर्णयान्वये उपलब्ध करुन देण्यात आलेल्या निधीचा तात्काळ विनियोग करण्यात यावा तसेच निधी विनियोगाच्या अनुषंगाने संचालक (विस्तार व प्रशिक्षण) यांनी वेळोवेळी उपयोगिता प्रमाणपत्र शासनास सादर करावे. सदर उपयोगिता प्रमाणपत्राच्या आधारे सचिव (कृषी) यांच्या स्वाक्षरीने सदर निधीचे उपयोगिता प्रमाणपत्र केंद्र शासनास निर्गमित करण्यात येईल.

८. हा शासन निर्णय वित्त विभागाचे शासन परिपत्रक क्र.अर्थसं-२०१९/प्र.क्र.४४/अर्थ-३, दि. ०१ एप्रिल, २०१९ नुसार विहीत केलेल्या अटींची पुर्तता होत असल्याने तसेच, सदर परिपत्रकानुसार या विभागास प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांनुसार निर्गमित करण्यात येत आहे.

९. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०१९०९२०१९२५४४४९०१ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

ZENDAGE MAHAVEER BALASAHEB

Digitally signed by ZENDAGE MAHAVEER BALASAHEB
DN: c=IN, st=Maharashtra, 2.5.4.20=a9503a5209c984c11d292912b642bdfd32282e4276fb5541f4f92f23cb110d23, postalCode=400032, street=MADAM CAMA ROAD,MANTRALAYA,MUMBAI, serialNumber=43d7bb272129cd1382853268481cb2ceee1f236d393acecb71084bc36ffeed02, ou=NA, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, cn=ZENDAGE MAHAVEER BALASAHEB
Date: 2019.09.24 11:13:10 +05'30'

(महावीर झेंडगे)
कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रति:-

१. मा. मंत्री (कृषि)यांचे स्वीय सहायक ,मंत्रालय, मुंबई
२. मा. राज्य मंत्री (कृषि) यांचे स्वीय सहायक ,मंत्रालय, मुंबई

३. मा.विरोधी पक्ष नेता ,विधानसभा ,विधानमंडळ सचिवालय ,मुंबई
४. मा.विरोधी पक्ष नेता ,विधानपरिषद ,विधानमंडळ सचिवालय ,मुंबई
५. मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई
६. अपर मुख्य सचिव (नियोजन), नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई
७. अपर मुख्य सचिव (वित्त), वित्त विभाग ,मंत्रालय, मुंबई
८. सचिव (कृषि) ,कृषि व पदुम विभाग ,मंत्रालय, मुंबई
९. आयुक्त (कृषी), कृषी आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे
१०. व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य बियाणे महामंडळ, अकोला
११. संचालक (विस्तार व प्रशिक्षण), कृषी आयुक्तालय, साखर संकुल, शिवाजीनगर, पुणे
१२. सर्व विभागीय कृषी सहसंचालक
१३. सर्व जिल्हा अधिक्षक कृषी अधिकारी
१४. महालेखाकार (स्थानिक निकाय लेखा परिक्षा व लेखा), मुंबई
१५. महालेखापाल (लेखा परिक्षा), महाराष्ट्र १/२, मुंबई/नागपुर
१६. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता) महाराष्ट्र १/२, मुंबई/नागपुर
१७. सर्व जिल्हा कोषागार अधिकारी, महाराष्ट्र राज्य
१८. सहायक संचालक (लेखा-१), कृषी आयुक्तालय, पुणे
१९. वित्त विभाग (कार्या. व्यय-१ / अर्थसंकल्प - १३), मंत्रालय, मुंबई
२०. निवड नस्ती-४अे